विषय: निबंध

लेखक: " विधवांचा कनवाळू'

संग्रहालय क्रमांक: ३८ / ५८

पुस्तकाचें नांव: विधवा दु

३८
सं. क्र.

# विधवा दुःख

निबंध

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५८
१८८८

[illegible]

# [illegible]वादुःखनिवेदन

आणि

## पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेविषयीं विचार.

हा लहानसा ग्रंथ

**एक विधवांचा कनवाळू**

यानें तयार करून,

आपल्या देशबांधवांस व देशभगिनींस

आदरपूर्वक अर्पण केला असे.

---

"यो नात्मजे नच गुरौ नच भृत्यवर्गे,
दीने दयां न कुरुते नच बंधुवर्गे ।
किं तस्य जीवितफलं हि मनुष्य लोके ?
काकोपि जीवति चिराय बलिं च भुङ्क्ते ॥"

---

ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यास व ह्याचें भाषांतर करण्यास सर्वांस पूर्ण मोकळीक मिळावी म्हणून त्या संबंधी कोणतेही हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडेस राखून ठेविलेले नाहींत.

---

मुंबई
सुबोधप्रकाश छा० छा०
सन १८८९.

---

किंमत ।· टपाल व बंगीखर्च घेणारांवर पडणार नाहीं.

र. नं २४७८

( निदान एकवार कृपापूर्वक समग्र वाचून पहावा )

# विधवादुःखनिवेदन.

आणि

## पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेविषयीं विचार.

हा लहानसा ग्रंथ

**एक विधवांचा कनवाळू**

यानें तयार करून,

**आपल्या-देशबांधवांस व देशभगिनींस**

आदरपूर्वक अर्पण केला असे.

---

" यो नात्मजे नच गुरौ नच भृत्यवर्गे,
दीने दयां न कुरुते नच बंधु वर्गे।
किं तस्य जीवितफलं हि मनुष्य लोके?
काकोपि जीवति चिराय बाल च भुङ्क्ते ॥ "

---

हा ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यास व ह्याचें भाषांतर करण्यास सर्वांस पूर्ण मोकळीक मिळावी ह्मणून त्या संबंधी कोणतेही हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडेस राखून ठेविलेले नाहींत.

---

मुंबई
सुबोधप्रकाश छा॰ छा॰
सन १८८९.

---

किंमत ।. टपाल व बंगीखर्च घेणारांवर पडणार नाहीं.

सं. ग्रं. १०८

# प्रस्तावना.

—:०:—

आमच्या देशांत इंग्रजी राज्य झाल्यापासून विद्येचा प्रसार जिकडे तिकडे जारीनें होत आहे, व शिकलेली नवीन मंडळी आपल्या देशाचें कल्याण होण्याविषयीं अनेक उपायांची योजना करीत आहे. कोणी राजकीय प्रकरणांत, कोणी व्यापार संबंधी विषयांत, कोणी सामाजिक स्थिति सुधारण्यांत, आपल्या देशांस हितावह अशा तजविजी करण्यांत उद्युक्त आहेत. सामाजिक सुधारणा ज्या बाबतींत होणें अवश्य आहे त्यांतील विशेष अगत्याची आमच्या तरुण विधवांची सध्याची शोचनीय स्थिति होय. परंतु ह्या विषयाकडे जितकें पाहिजे तितकें लोकांचें लक्ष अजून लागलेलें दिसत नाहीं. बंगाल्यांत **पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर** व **मुंबई प्रांतांत कै० विष्णु परशुराम** शास्त्री, या दोन महा पुरुषांच्या उद्योगानें कांहीं विधवांचे पुनर्विवाह झाले आहेत व अजूनही एकादा दुसरा पुनर्विवाह झाल्याचें शुभवर्तमान वर्ष दोन वर्षांत ऐकण्यांत येतें. **मद्रास** प्रांतांतही एक पुनर्विवाहोत्तेजक मंडळी नुक्तीच स्थापन होऊन **दिवाणबाहादूर रा० रघुनाथराव** आणि दुसरे कांहीं उद्योगी गृहस्थ यांच्या खटपटीनें कांहीं विधवा दुःख मुक्त झाल्या आहेत. तथापि लोकसमुदाय अद्याप ह्या सुधारणेच्या विरुद्ध आहे तसाच आहे. केवळ अशिक्षित व मूर्ख लोकच ह्याच्या विरुद्ध आहेत असें नाहीं. तर पुष्कळ विद्वान् व शाहणे ह्मणविणारे लोक देखील ह्यास प्रतिकूल आहेत. विधवांच्या पुनर्विवाहाच्या संबंधानें लोकांचे ४ वर्ग करितां येतील ते असेः—

१. "पुनर्विवाह सशास्त्र व सयुक्तिक असो अगर नसो, आह्मांस तो मुळींच कर्तव्य नाहीं; व कोणी दुसऱ्यानें तो केल्यास, त्यास व त्याशीं व्यवहार करणारांस आह्मी बाहिष्कृत करूं" असें ह्मणणारे.

२. "पुनर्विवाहाचा मार्ग आहे बरा परंतु तो रूढि व शास्त्र यांच्या विरुद्ध आहे ह्मणून तो प्रचारांत आणूं नये" असें ह्मणणारे.

३. "पुनर्विवाह सशास्त्र व सयुक्तिक आहे, परंतु तो रूढीविरुद्ध असल्यामुळें करूं नये, कारण त्यापासून लोकांशीं द्वेष उत्पन्न होतो," असें ह्मणणारे.

४. "पुनर्विवाह सशास्त्र व सयुक्तिक आहे तस्मात् तो करण्यास कांहीं बाध नाहीं. रूढि नसली तरी चिंता नाहीं, हळू हळू लोक अनुकूल होतील," असें ह्मणणारे.

या चार वर्गांपैकीं पहिल्या व दुसऱ्या वर्गांत असणारे लोक पुष्कळ आहेत. त्यांची संख्या उत्तरोत्तर कमी होऊन, तिसऱ्या व चवथ्या वर्गांतील लोकांची संख्या वाढणें इष्ट आहे. पहिल्या वर्गांतील दुराग्रही लोकांविषयीं येथें विशेष विचार कर्तव्य नाहीं. विद्येचा प्रसार जसजसा अधिक होईल तसतसा त्यांचा दुराग्रह कमी होऊन ते विचार करणारांच्या कोटींत येतील व तसें झालें ह्मणजे ते इतर तीन वर्गांपैकीं कोणच्या तरी वर्गांत येतील. ह्या ग्रंथाचा उपयोग विशेषेंकरून दुसऱ्या वर्गांतील लोकांस होईल व त्यांच्याच करितां तो रचिला आहे. जे पुनर्विवाह सशास्त्र आहे असें ह्मणतात, आणि जे सशास्त्र नाहीं असें ह्मणतात, या दोन्ही वर्गांपैकीं थोड्यांसच ह्याविषयीं माहिती असते. बहुतकरून ते दुसऱ्यांच्याच सांगण्यावर अवलंबून असतात. विरुद्ध पक्षांतील बहुतेक शास्त्री पंडितलोक इतर विषयांत जरी निपुण असले तरी, पुनर्विवाहप्रकरण पूर्णपणें पाहिल्यावांचूनच "पुनर्विवाह अशास्त्र आहे" असा सिद्धांत ठरवितात व लोकरूढीनें बद्ध असल्यामुळें त्यांस तो सिद्धांत बरोबर आहे असें वाटतें. तसेंच पुनर्विवाह पक्षाकडील कित्येक लोकांस तो मार्ग हितकारक आहे असें समजत असल्यामुळें त्याच्या सशास्त्रतेविषयीं शंका नसते, कारण जो मार्ग हितकारक व न्यायास अनुसरून आहे तो बहुधा आमच्या दूरदर्शी व ज्ञानवान् धर्मशास्त्रकारांस सम्मतच असेल असें अनुमान ते काढितात, तें ठीकच आहे. परंतु वस्तुतः पुनर्विवाह सशास्त्र आहे किंवा नाहीं हें जाणून घेणें सर्वांस उचित आहे. विरुद्ध पक्षांतील लोक बहुधा असें ह्मणत असतात कीं पुनर्विवाहपक्षाचें खंडण काशीकर पंडितांनी केलें आहे, व पुण्यास शके १७९१ सालीं, जो वादविवाद झाला त्या वेळेसही पुनर्विवाहपक्षाचें खंडण झालें आहे. बहुधा असें ह्मणणाऱ्या लोकांस काशीकर पंडितांचें मत अथवा पुण्यास झालेल्या वादविवादांत पुनर्विवाहाविरुद्ध आणिलेले आक्षेप, यांचें **पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर व कै० विष्णु परशुराम शास्त्री** यांनीं किती उत्तम रीतीनें निरसन केलें आहे, हें माहीत नसतें. तसेंच पुनर्विवाहपक्षांतील कित्येक लोकांस शास्त्राची माहिती नसल्या कारणानें, कोणी शास्त्री

पंडित एकादें निषेधपर वचन ह्मणून दाखवितात तेव्हां ते गडबडून जातात. ज्यांस खरा प्रकार काय आहे, हें जाणण्याची इच्छा आहे त्यांना ह्या लहानशा ग्रंथापासून बराच उपयोग होईल अशी ग्रंथकर्त्यास आशा आहे.

विरुद्ध पक्षांतील लोक बहुधा जे आक्षेप आणीत असतात त्यांचा विचार ह्या ग्रंथांत संक्षिप्त रीतीनें केला आहे. जे कोणी पक्षपात सोडून शांतपणें सर्व साधक बाधक वचनांचा विचार करतील त्यांची पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेबद्दल खातरी झाल्यावांचून राहणार नाहीं.

पुनर्विवाह सशास्त्र असला तथापि रूढीविरुद्ध असून तो केल्यानें लोकांशीं द्वेष उत्पन्न होतो ह्मणून तो करूं नये, असें ज्यांचें ह्मणणें आहे त्यांस इतकेंच सुचविणें आहे कीं, पुनर्विवाहाचा मार्ग लोकांचें अनहित करण्याकरितां काढला नाहीं,असें असून जे त्यास विचार केल्याशिवाय प्रतिकूल होतात ते समंजस लोक नव्हत. ह्मणून त्यांनीं सध्या द्वेष केला तथापि त्याकडे दुर्लक्ष्य करून शहाण्या व समंजस लोकांनी थोडें धैर्य धरिलें व पुनर्विवाहपक्षास आपली अनुकूलता प्रकट केली ह्मणजे पुनर्विवाहाचीही हळू हळू रूढि पडेल. मग लोकांचा द्वेष विशेष राहणार नाहीं. पुनर्विवाहपक्षास प्रतिकूल असणारे शास्त्री वैदिक व इतर भिक्षुक लोक सारेच अविचारी आहेत असें नाहीं. "**सुखेनैव भोक्तव्यं जुषामहे,**" हीच आपल्या ज्ञानाची सीमा व जन्माची सार्थकता समजणारे भटजी, कदाचित् श्राद्धांची संख्या कमी होईल अशा भीतीनें, बालविधवांच्या पुनर्विवाहास हट्टानें प्रतिकूल असतील. परंतु बहुतेक शास्त्री वैदिक लोक केवळ रूढीच्या पाशानें बद्ध असल्यामुळें व पुनर्विवाह अशास्त्र आहे अशी त्यांची समजूत असल्यामुळें, तो करूं नये ह्मणून ह्मणतात. त्यांस बिचाऱ्या अनाथ विधवांची दया येत नाहीं असें नाहीं. ह्या प्रांतांत (ह्मणजे मध्य प्रदेशांत) **सागर** नांवाचें एक मोठें जुनें शहर आहे. तेथील धर्माधिकाऱ्यांस ग्रंथकर्त्यानें ह्या विषयीं एक पत्र पाठविलें होतें. त्याचें उत्तर त्यांनीं फार शांतपणें दिलें. त्यांत ते असें ह्मणतात कीं "खरेंच त्यांची (तरुण विधवांची) अवस्था परम दुरवगाह्य व परम शोचनीय आहे व त्या परम कारुण्यास्पद आहेत यांत किमपि संदेह नाहीं. परंतु काय करावें, त्यांचे दुर्दैवापुढें कांहींच उपाय चालत नाहीं; शास्त्रकारांनीं निषेध शृंखलेंत बद्ध केल्यामुळें कांहीं इलाज चालत नाहीं."ही निषेध शृंखला कि-

तीशी बळकट आहे हें निषेध व विधि वाक्यांचा ह्या ग्रंथांत विचार केला आहे त्यावरून वाचकांस सहज कळेल. वैधव्य प्राप्त होणें स्त्रियांचें महत् दुर्भाग्य तर खरेंच. परंतु विधवांस दुःखमुक्त करण्याचे योग्य उपाय आमच्या शास्त्रकारांनीं योजून ठेविले नाहींत अशी कल्पना करणें, ह्मणजे त्यांच्या दूरदर्शित्वास, ज्ञानास व न्यायबुद्धीस दोष देण्यासारिखें होतें. ज्यांची सर्वांवर समदृष्टी ते अनाथ स्त्रियांविषयींच अन्यायाचा व हानिकारक नियम करतील हें संभवेल तरी कसें? आमच्या धर्माधिकारी महाराजांसारिखें ज्यांचें दयार्द्र हृदय आहे व ज्यांस दीन विधवांची करुणा येत आहे त्यांस इतकीच विनंती आहे कीं त्यांनीं दुराग्रहाचें पटल एकीकडे सारून न्यायदृष्टीनें त्या बिचाऱ्यांची स्थिति अवलोकन करावी व धैर्य कुठारानें रूढीच्या बंधनांचा उच्छेद करून धन्यता मिळवावी.

जे अत्यंत दुराग्रही आहेत त्यांपासून ह्या प्रकरणांत कांहीं लाभ होण्याची ग्रंथकारास आशा नाहीं. ते कदाचित् हा ग्रंथ हातीं देखील घेणार नाहींत व दुसरा कोणी घेईल तर त्यास ते बहिष्कृत करतील. परंतु सुज्ञ व समंजस लोकांस व विशेषें करून नवीन सुशिक्षित मंडळीस, अशी प्रार्थना आहे कीं त्यांनीं हा ग्रंथ समग्र वांचून त्याचा शांतपणें विचार करावा. व धैर्य धरून सत्यास अनुसरावें. अनाथ अबलांचा कैवार घेऊन त्यांच्या सुखाविषयीं यत्न केल्यानें, ह्मणजे पुनर्विवाह पक्षास अनुकूल झाल्यानें, सध्या कांहीं अडचणीं सोसाव्या लागतील, तरी त्या सोसून आपलें कर्तव्य बजाविणें हा प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचा धर्म होय. "जगांत आजन्म सुखी असा प्राणी विरळाच. बहुधा सर्वांस कष्ट व दुःखें सोसावीं लागतातच, मग परोपकार करण्यांत थोडी तनमनधनाची घस सोसावी लागली ह्मणून काय झालें?" असा विचार सदोदित बाळगावा व तदनुसार यथाशक्ति आचरण करावें, यांतच जन्माचें सार्थक्य आहे असें महान् महान् तत्ववेत्त्यांचें मत आहे. व्याससंहितेंत ह्मटलें आहे कीं:—

जीवन्ति जीविते यस्य विप्रा मित्राणि बान्धवाः ।
जीवितं सफलं तस्य—आत्मार्थे को न जीवति ? ॥
पशवोऽपिहिजीवन्ति केवलात्मोदरम्भराः ।
किंकायेन सुगुप्तेन बलिना चिरजीविनः ॥

नि. 36

तसेंच इतर नीतिग्रंथांत ह्मटलें आहे कीं–

परोपकारः कर्त्तव्यः प्राणैरपिधनैरापि ।
परोपकारजं पुण्यं न स्यात्क्रतु शतैरापि ॥
धनानि जीवितं चैव परार्थे प्राज्ञ उत्सृजेत् ।
तन्निमित्तो वरं त्यागो विनाशे नियते सति ॥

आतां अधिक पाल्हाळ न करितां वाचकांस इतकीच प्रार्थना आहे कीं ह्या ग्रंथांत भाषेच्या संबन्धानें कांहीं प्रमाद घडले असतील त्यांविषयीं कृपाळू होऊन ग्रंथकर्त्यास क्षमा करावी व मुख्य तात्पर्यावर लक्ष द्यावें.

हा ग्रंथ ज्या ग्रंथांच्या आधारें रचिला आहे त्यांचीं नांवें:–

१. विधवा विवाह. ( पंडित ईश्वरचंद्रकृत बंगाली ग्रंथाचें कै० विष्णुशास्त्री यांनीं केलेलें मराठी भाषांतर ).

२. विधवोद्वाहविवेक. ( काशीकर पंडितांच्या आक्षेपांचें, कै० विष्णु शास्त्री यांनीं केलेलें खंडण ).

३ विधवा विवाहाविषयीं पुण्यास झालेला वाद.

४. स्त्रीपुनर्विवाहाविषयीं पुण्यास व नाशकास, कै० विष्णुशास्त्री यांनीं दिलेलीं व्याख्यानें.

५. तैत्तिरीय आरण्यक ( कृष्णयजुर्वेदीय ) सायण भाष्य सहित.

६. आश्वलायन गृह्यसूत्र.

७. धर्मशास्त्रसंग्रह ( अत्रि, विष्णु, हारीत, इत्यादि १८ स्मृती ).

८. मनुस्मृती–कुल्लुकभट्टकृत टीकेसहित.

९. याज्ञवल्क्यस्मृती––विज्ञानेश्वरकृत टीकेसहित.

१०. धर्मसिंधू; न्यायसिंधू; शूद्रकमलाकर.

ता. २९ जानेवारी सन १८८९ इ०
मु० हुशंगाबाद. मध्यप्रदेश.

**एक विधवांचा कनवाळू.**

अं.१२.१०८

# विधवादुःखनिवेदन.

---

**सुज्ञ जन हो!**

आह्मी अनाथ व अति दुःखित विधवा आपणांस शरण आलों आहों, तरी आह्मांवर दया करून आमची विनंती शांतपणें सर्व ऐकून घ्यावी आणि नंतर आह्मांस संकटांतून बाहेर काढण्याविषयीं आपणांस आमच्या सुदैवानें बुद्धि उत्पन्न झाल्यास, योग्य उपायाची योजना आपण करावी.

आह्मांस वैधव्य प्राप्त झाल्यामुळें जी आमची दुर्दशा झाली आहे, ती आपणांस सर्व दिसतच आहे. संसार सुखावर पाणी तर पडलेंच आहे; परंतु आमचें जिणें देखील आह्मांस व आमच्या आप्तवर्गांस जड झालें आहे. रात्रंदिवस मरेमरेतों काबाडकष्ट करूनही, आमच्या नणंदा जावा व सासूसासरे संतुष्ट न होतां नित्य टोंचीतच असतात. आह्मांस वैधव्य आलें ह्यांत आमचा किंचित् ही अपराध नसून, आमच्या यजमानांच्या मृत्यूबद्दल आह्मांसच दोष देतात! आपणच विचार करा बरें, आपलें सौभाग्य नष्ट व्हावें ह्मणून कोणी तरी इच्छील का? आह्मांपैकीं कित्येक तर अद्याप इतक्या अज्ञान आहेत कीं, त्यांस वैधव्य व सौभाग्य यांतील भेद समजत नाहीं! त्यांना आपलें लग्न झालेलें सुद्धां आठवत नाहीं. अशा अर्भकांचा सारा जन्मचा जन्म वैधव्य दशेंत जावयाचा आहे, तो कसा जाईल ह्याचा आपणच विचार करावा. आमच्या सौभाग्यवती बहिणी, भावजया, नणंदा, जावा इत्यादि आप्तवर्गांतील स्त्रिया संसारसुखाचा कसा उपभोग घेत आहेत पहा! देव करो आणि त्या जन्म सावित्री होवोत! आह्मांस त्यांचा मुळींच हेवा करावासा वाटत नाहीं. आमचें कपाळ फुटकें ह्मणून आह्मांस ही दशा प्राप्त झाली आहे व आह्मांस तिजपासून मुक्त करण्याविषयीं कोणीही यत्न करीत नाहीं. हळदकुंकू, लग्न, मुंज इत्यादि मंगलकार्यांत चारचौघीबायांत मिसळण्याचा तर आह्मांस अधिकार नाहींच, परंतु सहज को-

णी घराबाहेर जाऊं लागल्यास आह्मांस अंधार कोठडींत दडणें भाग पडतें; कारण त्या वेळेस आमचें तोंड त्याच्या दृष्टीस देखील पडतां कामा नये, कां तर अपशकून होईल! आमच्या घरांतील गडीमाणसांस व मोलकरणींस जें सुख व जी स्वतंत्रता आहे त्याच्या शतांश देखील सुख व स्वतंत्रता आह्मांस नाहीं. फार तर काय, त्यांना दोनवेळ अन्न मिळतें तें देखील आह्मांस प्राप्त होत नाहीं. हवी तशी मजूरी करून आह्मांस एक वेळ खाण्याची परवानगी, व तीही अनेक उपोषणांच्या दिवशीं बंद! नानातऱ्हांनीं आपलें शरीर झिजवावें हाच आमचा मुख्य धर्म होऊन राहिला आहे. इतक्यानें तरी आमच्या आप्तांचा व ज्ञातिबांधवांचा संतोष होतो काय? नाहीं. लग्नामुळें प्राप्त झालेलीं सौभाग्य चिन्हें सर्व हिरावून घेतात व डागडागिनें घालूं देत नाहींत. ह्यांत तर फारसें आश्चर्य नाहींच; परंतु ईश्वरानें दिलेले केंस, ज्यांनां आईनें न्हाणून माखून मोठ्या प्रेमानें वाढविले, तेही राहूं देत नाहींत! तेही एकवेळ काढिल्यानें आमचा जीव मोकळा होता तर बरें. परंतु तसें न होतां दर अंवसे पुनवेस आह्मांस खाटकाचे समोर, सर्व लाज एकीकडेस गुंडाळून ठेवून, डोकें उघडें करून बसणें भाग पडतें! त्या वेळेस असें वाटतें कीं डोईसोडून गळ्यावरच जर वस्त्रा ठेवील तर बरें होईल; व असें करण्यास आह्मीं कित्येक वेळां त्या खाटकाची विनवणी देखील करितों; परंतु जेथें सारें जगच आह्मांवर रुष्ट झालें आहे तेथें त्याच दुष्टास आमची दया कोठून येणार! आह्मीं आपलें शरीर किती जरी जाळिलें, व आह्मांला किती जरी विद्रूप केलेंत, तरी आमचे मनोविकार नष्ट होतात काय? मृत्यु पत्करेल परंतु त्याहूनही अधिक दुष्ट आह्मांस नित्य क्लेश देणारा आमचा एक अति बलवान् हाडवैरी आहे, त्याच्या पुढें आमचा अगदीं नाइलाज आहे. त्याला शिवानें जाळून टाकिला आहे व तो अनंग ह्मणजे अंगहीन आहे असें ह्मणतात; परंतु आह्मांस तर तो मोठा पराक्रमी व विकट असा भासतो. आह्मांसच काय, त्याणें मोठ मोठाल्या तपस्व्यांस देखील जेर करून सोडिलें आहे, अशा कथा आह्मी पुराणांत नित्य ऐकतों. मोठमोठे साधूसंत, ऋषिमुनी, व ब्रह्मज्ञान सांगणारे लोक, ह्याच्या तडाक्यांत सांपडून धर्मभ्रष्ट झाले आहेत, व होत आहेत, तर आमची कथा काय! असें असूनही आह्मांपैकीं बऱ्याच स्त्रिया त्या दुष्ट व भयंकर शत्रूचा पराभव करून त्यावर जय मिळवितात असें दिसतें.

पावरून आह्मांमधील काम वासना पति मरणानंतर नष्ट होते ह्मणून आ-ह्मीं तशा राहतों असें ह्मणाल तर तसें नव्हे, तर आह्मांस आमच्या घरां-तील व ज्ञातींतील माणसांकडून जो तोंड दाबून बुक्यांचा मार मिळत असतो तेणेंकरून आह्मीं निरुपाय होऊन बंदिवानांप्रमाणें राहतों. परंतु इतका दाब असूनही मोठ मोठ्या ऋषिमुनींस व शूरवीरांस अजिंक्य अशा प्रबल शत्रूच्या स्वाधीन होऊन, आह्मांपैकीं कित्येक स्त्रिया वैधव्य धर्मापासून भ्रष्ट होतात, व आपल्या दुष्कृतीचे परिणाम स्वतः भोगून, आपल्या आप्त वर्गांस व ज्ञातिबांधवांस भोगावयास लावितात, ह्यांत नवल तें कोणतें ?

**अहो आईबाप, काका, मामा, इत्यादि वडील जन हो !** तुह्मांस आमची कशीहो दया येत नाहीं ! आह्मीं तुमच्याच मुलीं, पुतण्या व भाच्या ना ? मग आमच्याविषयीं तुह्मी इतके निष्ठुर कां झालांत बरें ! सासू सासऱ्यांस आमची दया येत नाहीं तर न येवो पण तुह्मांस आमची कींव येऊं नये हें मोठें आश्चर्य होय. आह्मीं तुमच्या पोटचे गोळे आहोंत किंवा नाहीं ? आहोंत तर आमच्याशीं कां बरें दुजा भाव करितां ? आम-च्या बांधवांपैकीं कोणी दुर्दैवानें विधुर झाला तर लागलीच त्याच्या दुसऱ्या लग्नाची तयारी कशी झटून करितां बरें? तशीच कृपादृष्टि आह्मां गरिबां-वर कां करीत नाहीं बरें ? मरणें जिणें आपल्या स्वाधीन नाहीं खरें; परंतु मुलांच्या सुख दुःखाची काळजी तुह्मी वाहतां, तशीच आह्मां हतभागिनी मुलींविषयीं हो कां काळजी बाळगीत नाहीं ? आह्मी जर सर्वस्वी टाका-ऊच आहों, तर आह्मांस जन्म तरी कां दिला बरें? जन्मतांच जर आम-चा नाश केला असता तर ह्या हाल अपेष्टा भोगण्याचा प्रसंग आह्मांवर आला नसता.

**अहो बंधु जन हो !** तुह्मांस तरी तुमच्या या दीन भगिनींची कांहीं दया येऊं द्या. तुह्मी सर्व संसारसुखें भोगितां ती खुशाल भोगा. ईश्वर तुह्मांस उदंड आयुष्य देवो व तुमची दिवसें दिवस बढती करो ! परंतु प्रार्थना ह्मणून एवढीच कीं, आपण सुख भोगीत असतां, आपल्या दुःखित व अनाथ भगिनींस विसरून जाऊं नका. तुह्मी व आह्मी एकाच मातेच्या पोटीं जन्म घेतला आहे, तरी आह्मांस परक्या न समजतां जसें तुह्मी आपल्या स्वतःच्या सुखाविषयीं झटतां, तसेंच आह्मांसही सुखी क-रण्याविषयीं यत्न करा. **अहो वहिनी हो !** आमच्या दादांस संसारका-

मामुळें आह्मांविषयीं विचार करण्यास फावत नसल्यास, तुह्मी तरी एकांतांत वेळ पाहून त्यांना आमची आठवण करून देत जा; व आह्मांविषयीं चार गोष्टी सांगत जा. आमचें तुमचें जरी कधीं मधीं भांडण झालें असेल, तरी ते सर्व प्रेम-भांडण समजून त्याविषयीं आह्मांस क्षमा करून, दादांजवळ आमच्या वतीनें शिफारस करीत जा. कधीं तरी त्यांस आह्मांविषयीं दया उत्पन्न होईलच होईल.

**अहो इतर समंजस व विद्वान देशबांधव हो !** तुह्मीं आपल्या हजारों दुःखग्रस्त देशभगिनींविषयीं इतके उदासीन कां बरें आहांत ? ईश्वरकृपेनें तुह्मांस विद्या, धन, व अधिकार प्राप्त झाले असून, आह्मां-अबलांचें कल्याण करण्याविषयींच तुह्मी सामर्थ्यहीन कसे झालांत ? ह्या संसारसंबंधी मोठमोठाल्या उलाढाली तुह्मी करितां व अनेक बिकट कामें तुमच्या हातून तडीस जातात; परंतु आह्मां अनाथांचें हित करण्याकडेस तुमचें दुर्लक्ष्य असण्याचें कारण आह्मांस मुळींच कळत नाहीं. तें कांहीं कां असेना; आजपर्यंत आमची हेळसांड केलीत ती केलीत, परंतु ह्यापुढें तरी आह्मांवर दया करा व आमच्या सुखाविषयीं यत्न करा. तुह्मांस विद्या व अधिकार देऊन ईश्वरानें तुह्मांवर तुमच्या देशाची व ज्ञातीची जबाबदारी ठेविली आहे, ती तुह्मांस योग्य रीतीनें बजाविली पाहिजे. आमचें कल्याण जर तुमच्या सारख्यांच्या हातून न झालें तर मग कोणाच्या हातून होणार आहे ! आह्मी सर्वस्वी तुमच्याच भरंवशावर आहोंत, तरी आमच्या विनंतीकडे दुर्लक्ष्य होऊं नये.

**अहो आर्यमहिलासमाजस्थ बायांनो !** तुह्मी ह्या देशांतील सर्व स्त्रियांची सांप्रतची निकृष्ट दशा सुधारण्याचें व्रत घेतलें आहे असें आह्मीं ऐकतों. हें खरें असल्यास आमचें भाग्य उदयास आलें असें समजलें पाहिजे. कारण तुमच्या हातून आमचें दुःख सहज निरसन होण्यासारखें आहे. तुह्मीं जर कृपाळू होऊन आपल्या घरच्या पुरुषांस व आपल्या इष्टमैत्रिणींस आह्मांविषयीं नित्य बोध करीत जाल, तर तो त्यांच्या मनांत सहज ठसण्यासारिखा आहे. तुह्मी आमच्या सजातीय असल्या कारणानें पुरुषांपेक्षां तुह्मांस आमच्या सुखदुःखाचें खरें स्वरूप अधिक माहीत आहे, तरी आह्मांविषयीं तुह्मी सर्व आळस टाकून प्रयत्न कराल अशी मोठी आशा आहे. व हीच प्रार्थना इतर सर्व सुशिक्षित देशभगिनींस आहे.

**अहो विद्याखात्यांतील प्रोफेसर, मास्तर, व इतर अधिकारी मंडळी हो!** सर्व दुःखांचें मूळ जें अज्ञान तें काढून टाकून त्याच्या जागीं सर्व सुखांचें मूळ जें ज्ञान त्याची पेरणी सर्वांच्या हृदयांत करण्याचें काम तुह्मी पत्करिलें आहे, तें फारच स्तुत्य होय ह्यांत संशय नाहीं. परंतु तें काम तुह्मी पूर्णपणें बजावीत नाहीं असें आमच्या अल्प बुद्धीस वाटतें, कारण आज तुमचें खातें स्थापन होऊन पुष्कळ वर्षें झालीं तरी लोकांच्या मनांतील आह्मांदुर्बलांविषयी दुराग्रह आहे तसाच आहे. शाळांतून व कालेजांतून आजपर्यंत हजारों लोक विद्या शिकून मोठमोठाल्या हुद्यांवर नियुक्त आहेत, व मोठे विद्वान ह्मणून त्यांची लोकांत ख्याती आहे; परंतु त्यांपैकीं कितीकांस आमच्याविषयीं खरा कळवळा वाटतो बरें? आह्मी त्यांच्या भागिनी नानाप्रकारचे कष्ट व हाल भोगीत असतां ते आह्मांकडे पहात स्वस्थ बसले आहेत, व आमची दुःखापासून सुटका करण्याविषयीं किंचित्‌ही यत्न करीत नाहींत; हा का विद्येचा व ज्ञानाचा परिणाम? तुह्मी मुलांनां मोठमोठाले ग्रंथ शिकवितां; अंकगणित, बीजगणित, रेखागणित, त्रिकोणमित्ती, ज्योतिषशास्त्र असे नानाप्रकारचे विषय त्यांस सांगतां, व त्यांतील अनेक गूढ प्रश्न मोठ्या परिश्रमानें सोडवितां; परंतु "आमच्या देशभगिनींची व त्यांतून विशेषेंकरून तरुण विधवांची दशा काय आहे व ती सुधारण्याचा उपाय काय?" हा प्रश्न तुमच्या एका तरी बुकांत आहे काय? किंवा तो कधीं तुमच्या मनांत येऊन तो सोडविण्याविषयीं तुह्मी अथवा तुमच्या शिष्यांपैकीं कोणी यत्न करितां काय? तुह्मी व्याकरणशास्त्र विद्यार्थ्यांस पढवितां व "रामः रामौ रामाः" इत्यादि शुष्क शब्दांचीं रूपें सिद्ध करीत बसतां, परंतु आमचें ईश्वरदत्तरूप तुमच्या दृष्टीसमोर विद्रूप होत असतां तें रक्षण करण्याविषयीं तुह्मीं कांहींच उद्योग करीत नाहीं, हें कसें! तुह्मी न्यायशास्त्राचे मोठमोठे ग्रंथ शिकवितां परंतु आह्मा गरीबांवर जो अन्याय व जुलूम होत आहे त्याची कल्पना देखील तुमच्या व तुमच्या शिष्यांच्या मनांत येत नाहीं. सारांश अनेक विषय तुह्मी शिकवितां, परंतु नीतिशास्त्र व धर्मशास्त्र मुळींच शिकवीत नाहीं; ह्मणून तुमच्या देशभगिनींची स्थिति कशी असली पाहिजे, पूर्वीं कशी होती व सध्यां कशी निकृष्ट झाली आहे, ह्या गोष्टीचा विचार लोकांत व्हावा तसा होत नाहीं; व त्यामुळेंच आह्मां अनाथ विधवांची अशी दुर्दशा झाली आहे, असें

आह्मांस वाटतें. तुमच्या हातून जी नवीन विद्वान् मंडळी तयार होत आहे ती बहुधा केवळ आपल्याच सुखाचीं साधनें मिळविण्यांत निमग्न असते. आह्मांसारिख्या अनाथांची परवाच त्यांना नाहींशी होते. आमच्या तोंडून कांहीं अधिक उणा शब्द निघाला असेल त्याबद्दल आह्मी तुमची क्षमा मागतों. आह्मी फार दुःखित व व्यथित असल्यामुळें आह्मांस कांहीं सुचेनासें झालें आहे व आह्मी काय बोलतों ह्याचें आह्मांस देहभान रहात नाहीं.

**अहो कारकूनमंडळीहो !** तुह्मी राज्यसंबंधी व व्यापारसंबंधी रोज मोठमोठे खरडे लिहितां, व जमाखर्च लिहितां. परंतु आमच्या सुखदुःखाचा हिशेब कधींतरी करितां काय? तुह्मीच किंहो तीन चार वर्षांमागे ह्या देशांतील मनुष्यगणती करून आह्मा अनाथ विधवांची संख्या दोन कोटींपेक्षां जास्त ठरविली आहे; त्यांपैकीं हजारों अल्पवयस्क असून त्यांच्या जन्माचें सर्वस्वी मातेरें होणार, व त्यांच्या हातून जीं जीं पातकें घडणार व घडत आहेत त्यांचें टिप्पण तुमच्या दप्तरांत सांपडेल काय? तुमच्या दप्तरांत नसलें तरी **चित्रगुप्ता**च्या दप्तरांत तर अवश्य राहीलच; व ज्या वेळेस सर्वांच्या कर्मांबद्दल चौकशी होईल त्यावेळेस तें टिप्पण पुढें येऊन आमच्या कर्मांचीं फळें कोणीं भोगावीं ह्याचा निर्णय होईल. आमचा तर खास असा विश्वास आहे कीं **न्यायकारी परमेश्वरा**च्या घरीं आमच्या दुष्कर्मांबद्दल आमच्या देशबांधवांस व ज्ञातिबांधवांस प्रायश्चित्त भोगावें लागेल, कारण त्यांच्याच हयगईनें अथवा जुलुमानें आमची अशी दुर्दशा झाली आहे. तुमचें कर्तव्य हें कीं आमची नानाप्रकारची विटंबना होत आहे व आह्मांपैकीं कित्येकजणी निरुपायास्तव दुराचरणांत प्रवृत्त होत आहेत, त्यांच्या यादी तयार करून त्या लोकांसमोर वारंवार आणाव्या व त्यांच्या मनांत आह्मांविषयीं विचार व न्यायबुद्धि उत्पन्न करावी. हें आपलें कर्तव्य तुह्मी बजावावें अशी तुह्मांस आमची हात जोडून विनंती आहे.

**अहो जज्ज, माजिस्ट्रेट व पोलिस खासांतील अधिकार संपन्न देशबांधव हो !** तुह्मी मोठमोठालीं खटलीं नित्य तोडितां; अन्याय व जुलूम करणारांची खोड मोडितां; मोठमोठाल्या जबरदस्त अपराध्यांस धरून त्यांची पाठ फोडितां; अथवा जन्मठेपेची शिक्षा देऊन, त्यांस **आंदमन** सरख्या दूरस्थ बेटांत नेऊन सोडितां; सारांश आपल्या बुद्धिकौशल्यानें व न्यायचातुर्यानें नित्य विमल कीर्ति व पुष्कळ यश जो-

डितां; परंतु ह्या थेरड्या **रूढीनें** आमचें बोकांड गच्च धरिलें आहे, तिला तुह्मी कधीं झोडितां कांय? सर्व सृष्टीस तुह्मांपासून न्याय प्राप्त होतो, परंतु आह्मां दुर्दैव्यांसच मात्र तो मिळेनासा झाला आहे. आह्मांस ह्या दुष्ट **रूढी**च्या कचाट्यांतून सोडविण्याविषयीं तुह्मी कांहीं प्रयत्न करीत नाहीं. इतकेंच नाहीं, तर आह्मांपैकीं कोणी जर (त्या मेल्या **रूढीसच** अनुसरून) कांहीं अपराध केला तर तुह्मीचकिहो तिची फट फजीती करून तिला कैदेची किंवा फांशीची शिक्षा देतां! असें करण्यांत तुह्मी दोषी आहांत असें आमचें ह्मणणें नाहीं, कारण दयालु महाराणीचा कायदाच तसा आहे; व तो अमलांत आणण्याकरितांच तुह्मांस मोठमोठे पगार देऊन सरकारानें चाकर टेविलें आहे, ह्मणून तुह्मांस तुमचें कर्त्तव्य बजाविलेंच पाहिजे. परंतु आमच्या हातून गर्भपात, भ्रूणहत्या, बालहत्यादि अपराध घडल्यावर आह्मांस त्याबद्दल शिक्षा देणें जसें तुमचें कर्त्तव्य कर्म आहे, तसेंच आमच्या हातून तसले अपराध घडूं नयेत अशी कांहीं तजवीज करणें ही पण तुमचें कर्त्तव्य होय. गर्भपातादि अपराध व पाप कर्मैं करण्याची आह्मांला हौस का आहे? परंतु करावें काय. आमचे आप्तच आमची कांहीं सोय करीत नाहींत व नैसर्गिक मनोविकार ही आह्मांस सोडीत नाहींत—"एकीकडे आड व दुसरी कडे विहीर," असें आह्मांस झालें आहे. अशा संकटांतून पारपडण्यास तुह्मांसारिख्या **गरीबपरवरांचें** सहाय्य आह्मांस अवश्य पाहिजे, तें मिळण्याविषयीं तुमची आह्मी विनवणी करीत आहों. आमच्या प्रार्थनेवर लक्ष्य द्या.

**अहो मंडलिक, तेलंग प्रभृति हायकोर्ट व इतर कोर्टांतील वकील दादांनो!** तुह्मी बड्याबड्या राजेरजवाड्यांचीं, जहागीरदारांचीं व इतर धनिक लोकांचीं वकील पत्रें घेऊन, त्यांच्या तर्फेनें मोटमोठाल्या न्यायपीठासमोर वाक्पांडित्य करून, परद्वीपस्थ न्यायाधिशांचीं मनें आपल्या मुद्या कडेस वळवून घेतां; व कोणाविषयीं अन्याय होत असला तर तो न होऊं देतां, जिकडे तिकडे न्याय व सत्याचा प्रसार होण्याकरितां रात्रं दिवस झटतां. तसेंच आह्मां अनाथ अबलांविषयीं यत्न केल्यास आह्मांवर तुमचे मोठेच उपकार होतील. तुह्मी जर मनावर घ्याल तर आपल्या रसाळ वाणीनें व विषय संपादनाच्या चातुर्यानें लोकांचीं मनें आमच्या कडेस सहज वळवूं शकाल. तुह्मांस फी वगैरे

देण्यास आह्मांस ऐपत नाहीं, तरी धर्मार्थच तुह्मी आह्मां अनाथ अबलांची वकीली पत्करावी. आमची अब्रू, आमचा धर्म, किंबहुना आमचे प्राणही धोक्यांत आहेत ते रक्षण करण्याचें यश तुह्मी घ्याल तर, आह्मी आभारपूर्वक तुमचें व तुमच्या मुलाबाळांचें सदा सर्वकाळ कल्याण चिंतीत राहूं व तुमचे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं.

**अहो सार्वजनिकसभेचे सभासद हो!** तुह्मी तरी सर्व गोरगरीबांचे वकीलच आहांत; व सर्वांची दाद सरकारापर्यंत पोचवितां तशीच आह्मां गरीबांची देखील दाद आपल्या सर्व देशबांधवांजवळ पोंचवावी. तुह्मी जे एका प्रसंगीं आमच्या एका दुर्दैवी भगिनीवर, ह्मणजे **विजया लक्ष्मी**वर उपकार केले आहेत, ते आह्मी विसरलों नाहीं व कधीं विसरणार नाहीं. मागणें ह्मणून इतकेंच कीं आमच्या हातून अपराध घडून आमची बेअब्रू झाल्यावर आमचें सहाय्य करण्या ऐवजीं आमच्या कडून अपराध घडूं नयेत अशी तजवीज तुह्मी करावी. तुमच्या सभेंत मोठमोठे विद्वान् धनवान् व सरदार लोक आहेत. त्यांनीं जर आह्मांवर दयादृष्टि करून आमचें कल्याण करण्याचें मनावर घेतलें तर त्यांना कांहीं कठिण जाईल असें नाहीं.

**अहो वर्त्तमानपत्रकर्त्ते आणि ग्रंथकार मंडळी हो!** ईश्वरानें लोकांच्या मनांत उदारता व सुविचार उत्पन्न करण्याचें साधन, जसें तुमच्या व शाळामास्तर लोकांच्या हातांत ठेविलें आहे, तसें इतर कोणंसच उपलब्ध नाहीं. तुह्मी अनेक विषयांवर लोकांच्या मनांत ठसणारे निबंध लिहितां, व आपले विचार लोकांकरवीं ग्रहण करवितां. असें असून आमच्या विषयींच तुमचें इतकें दुर्लक्ष्य कां हें आह्मांस कळत नाहीं. तुह्मी **इलबर्टबिल** किंवा **सिविल सर्विस** अशा एखाद्या विषयावर लिहिण्यास आरंभ केला, ह्मणजे लिहून लिहून त्या विषयाची पाठ पुरवितां. ज्याचा कैवार तुह्मी घेतां त्याचें आपल्या लेखन शक्तीनें कल्याणच करून सोडितां, मग आह्मां गरीबांचा कैवार घेऊन आपल्या वाचकांना आह्मांविषयीं सदोदित बोध कां बरें करीत नाहीं? आह्मी तुमच्या दयेस पात्र नाहीं काय? बरें स्वतः तुह्मी आमच्या विषयीं कांहीं लिहूं इच्छित नाहीं तर नाहीं, परंतु आमच्या वतीनें दुसरे कोणी लेख लिहून तुमच्या द्वारें लोकांत आमच्या हिताविषयीं चर्चा करण्यास उद्युक्त झाले, तर कांहीं तरी सबब सांगून ते लेखच प्रसिद्ध

करीत नाहीं. दादानों ! इतकी आह्मां दीन दुबळयांची हेळसांड करूं नका. आह्मी असें ऐकतों कीं कोणी **बैरामजी मलबारी** नांवाचा पारशी जातीचा एक वर्तमानपत्रकार, **बालविवाह** बंद करण्याविषयीं व **पुनर्विवाह** प्रचारांत आणण्याविषयीं दीर्घ प्रयत्न करीत आहे; व त्याणें मोठमोठ्या सरकारी अम्मलदारांस पुनर्विवाहाविषयीं कायदा करण्याबद्दल कांहीं सूचना केल्या आहेत. ह्या गृहस्थाचे आभार जितके मानावे तितके थोडेच. आह्मां अनाथांविषयीं जो इतकी खटपट केवळ परोपकारबुद्धीनें करीत आहे, तो खरोखरच मोठ्या मनाचा व दयावान् पुरुष असला पाहिजे. परंतु त्या उदार पुरुषास आमची अशी विनंती आहे कीं सरकारास कायदा करून पुनर्विवाह प्रचलित करण्याविषयीं अर्ज करण्याचें सोडून, सर्व लोकांसच बोध करून त्यांचीं मनें आह्मांकडेस वळवावीं. सरकारच्या कायद्यापासून आमचें विशेष हित होईलसें आह्मांस वाटत नाहीं. सरकारानें कायदा करून सती जाणें बंद केलें. सती जाण्याचा मार्ग जर खुला असता तर, आह्मांपैकीं निदान कांहीं तरी हत भागिनी आज वैधव्यदुःख भोगीत कशास बसल्या असत्या ? कधीं कधीं आमच्या मनांत विष खाऊन जीव द्यावा असें येतें; परंतु तसें करणें धर्मविरुद्ध व आमच्या उभय कुळांस नरकांत टाकणारें निंद्य कर्म असल्यामुळें तें आह्मांस करितां येत नाहीं. जितकें साधेल तितकें आह्मी वैधव्यास उचित अशा धर्मांनीं राहण्याचा यत्न करितों. परंतु कधीं कधीं आमच्या हातून अयोग्य वर्तन घडतें, त्यास उपाय नाहीं. सरकारच्या कायद्याप्रमाणें आह्मांस पुनर्विवाह करण्याची मोकळीक आहे खरी; परंतु त्या कायद्याची अशी विचित्र गती सांगतात कीं, विधवा स्त्री, पुनर्विवाह केल्यानें, तिला मिळालेल्या तिच्या पूर्वपतीच्या मालमत्तेस मुकते; परंतु जर ती पुनर्विवाह न करितां व्यभिचार करील तर त्या मालमत्तेचा आजन्म उपभोग घेण्याचा तिला अधिकार आहे ! सारांश व्यभिचारापेक्षां पुनर्विवाहाची योग्यता कमी ! अशा कायद्याला घेऊन काय चाटायचें आहे ? सरकारी कायदा ऐवजीं तुह्मी खटपट करून ह्या प्रकरणांत लोकांची संमत्ति जर संपादन कराल, तर आमचें मोठें कल्याण होणार आहे; तरी ती मिळविण्याकडेस आपली लेखणी चालवावी, अशी हात जोडून तुह्मांस आमची प्रार्थना आहे.

**अहो वैदिक व भिक्षुक मंडळी हो !** तुह्मांस "**वेदमूर्ति**" अशी

संज्ञा आहे तस्मात् तुह्मांस धर्माचें तत्व पूर्णपणें समजतें ह्यांत संशय नाहीं; परंतु सर्व धर्मांचें मूलतत्व "भूतदया" ती तुमच्या ठायीं दिसत नाहीं, हें कसें? निदान आह्मां अनाथांविषयीं तरी तुह्मांस तिळमात्र दया येत नाहीं हें उघड आहे. अहो! आह्मी अति दीनस्वरें करून तुमची प्रार्थना करीत आहों; तुह्मांपुढें पदर पसरून करुणा भाकीत आहों! तुमच्या चरणांवर लोळण घेत आहों, आणि आपलें सर्व दुःख तुह्मांस निवेदन करीत आहों; परंतु तह्मांस आमची यत्किंचित् करुणा येत नाहीं इतकेंच नाहीं, उलटें आह्मांकडे पाहून तुह्मांस हंसें येतें व तुह्मी आमच्या कुचेष्टा करण्यास उद्युक्त होतां. हें तुह्मांला शोभतें काय? आमच्या विवाहप्रसंगीं तुह्मी उच्च स्वरानें, "सौभाग्यमस्तु" "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" इत्यादि आशिर्वचनें दिलीं, तीं सर्व निष्फल झालीं; त्याबद्दल आह्मां गरीबांवर राग काढितां काय? तुह्मी मोठे स्नानसंध्याशील व धर्माचा अभिमान बाळगणारे ह्मणवितां, आणि आपल्या क्रूर वर्तनानें आह्मांपैकीं हजारों अबलांकरवीं अनेक पापें करवितां, हा धर्म काय? आपण आमच्या कल्याणाविषयीं कांहीं यत्न करीत नाहीं तर नाहीं; परंतु दुसरा कोणी आह्मांवर उपकार करण्यास उभा राहिला तर, त्याला ज्ञाती बाहेर टाकण्यास व जबर प्रायःश्चित देण्यास तयार होतां! बऱ्यावाईट परिणामाचा विचार न करितां "विधवांचा पुनर्विवाह करणें अधर्म होय" असा एकदम सिद्धांत ठरवितां. पुनर्विवाहाचा प्रतिबन्ध करितां आणि आह्मांपैकीं कोणाचें पाऊल वांकडें पडलें आणि उघडकीस आलें कीं, तिला बहिष्कृत करून तिची फटफजीती करितां. ह्याचा परिणाम असा होतो कीं गुप्त पाप अतोनात होतें, तेणें करून आपण धर्मरक्षणाविषयीं जी इतकी काळजी बाळगितां ती सर्व व्यर्थ होते पुरुषांस हवे तितके विवाह करण्याविषयीं मोकळीक देतां. घरच्या स्त्रिया असून ही त्यांनीं बटकी ठेविल्या तर त्यांस कोणी दोष देत नाहीं. साठी लोटून मसणांत हाडें जरी गेलीं असलीं तरी अशा पुरुषानें एखाद्या लहान मुलीशीं लग्न केलें तर, तुह्मी "शुभलग्न सावधान" ह्मणून ठाळी वाजविण्यास तयार होतां. आह्मांपैकीं शेंकडों बालविधवा जें दुःख भोगीत आहेत तें अशा प्रकारच्याच अन्यायमूलक विवाहांचें फल होय; तरी तुह्मी त्यांच्या पुनर्विवाहाचा प्रतिबन्ध करणें स्वधर्म समजतां. गाईस बळेंच चिखलांत लोटून तिला त्यांतून बाहेर न येऊं देणें हा तुमचा धर्म काय? नका हो आह्मां गरी-




॥ बाला केवलमेव शून्य हृदया शून्यं जगत्पश्यति ॥

बांचा छळ करूं! आह्मांस छळून तुह्मी काय मिळविणार? तुह्मांपैकीं कित्येक जण हा लोक सोडून परलोकीं लवकरच प्रयाण करणार, तरी जातां जातां आह्मां अनाथांवर उपकार करून जा; ह्मणजे तुमचें हें पुण्य ईश्वराकडे रुजू होईल. आजवर आह्मांवर अवकृपा केली ती केली, आतां तरी करुणा येऊं द्या. आह्मीं तुह्मांस शरण आलों आहोंत. तुमच्या चरणांवर लोटांगण घालितों व तुमची करुणा भाकितों.

**अहो शास्त्री पंडित हो**! तुह्मी सर्व शास्त्रें जाणतां. आह्मांस हितकारक असें शास्त्र एखादें असेल तर शोधून काढाहो महाराज! सती जाणें फार अवघड कर्म तें आह्मांपैकीं बहुतेकांस साध्य नाहीं व त्याविषयीं सरकारची बंदी आहे. ब्रह्मचर्य्य धर्म आह्मांपैकीं कोणी कोणी पालन करितात खऱ्या; परंतु पुष्कळांस तोही धर्म दुस्साध्यच आहे. या दोन्ही धर्मांपेक्षां सुगम व आमच्या शक्तीस व सध्याच्या कालास अनुसरून असा तिसरा एखादा धर्म कोठें सांगितला असल्यास तो शोधून काढाल तर, आह्मां हतभागिनींवर तुमचे मोठे उपकार होतील. आह्मीं असें ऐकतों कीं कोणी **ईश्वरचंद्र विद्यासागर** नांवाचा मोठा बंगाली पंडित आहे, त्यानें विधवांच्या पुनर्विवाहाविषयीं शास्त्राधार शोधून काढिला आहे. तसेंच **मुंबई** प्रांतांत कोणी **विष्णु परशुराम पंडित** नांवाचे विद्वान शास्त्री होते, त्यांनींही पुनर्विवाह सशास्त्र ठरवून, स्वतः एका विधवेशीं लग्न केलें, व त्याप्रमाणें कांहीं विधवांचीं लग्नें झालीं असेंही ऐकतों. हें खरें असल्यास हा मार्ग आह्मां तरुण विधवांस फार हितावह आहे, असें आह्मांस वाटतें. पुनर्विवाह सशास्त्र आहे किंवा अशास्त्र आहे हें आह्मां विद्याविहीन व मूर्ख बायांस कळत नाहीं; व ह्याविषयीं आह्मीं तुमच्याशीं वादविवाद करावा अशी आमची योग्यता नाहीं. आमच्या स्त्रीजातींत नुक्तीच एक **पंडिता** प्रसिद्धीस आली होती, व तिला स्वतः वैधव्यदुःखाचा अनुभव असल्यावरून आह्मांस अशी आशा होती कीं, ती ह्या प्रकरणीं कांहीं खटपट करून प्रसंग पडल्यास आमच्या वतीनें तुमच्यांशीं वादविवाद करील, परंतु आमचें नशीबच फुटकें ह्मणून ती बाई आमच्या धर्माचा व देशाचा त्याग करून परद्वीपस्थ झाली! अस्तु. आमच्या एका "**कनवाळूनें**" पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेविषयीं कांहीं प्रश्नोत्तररूप लेख लिहून आमच्या स्वाधीन केला आहे, तो आह्मी तुमच्या व इतर सज्जनांपुढें ठेवितों; व त्याचा शांतपणें विचार होऊन आ-

ह्मांस न्याय मिळेल अशी आशा बाळगितों. पुनर्विवाह शास्त्रास अनुसरून नाहीं, असें जरी तुह्मांस वाटेल, तरी आह्मांवर दया करून तो करण्याची आह्मांस मोकळीक द्यावी; कारण शास्त्रविरुद्ध आज अनेक हानिकारक चाली आमच्या ह्या देशांत चालू आहेत, व त्या विरुद्ध कोणी चकार शब्द देखील काढीत नाहीं. तरी पुनर्विवाह प्रचलित झाल्यापासून आह्मांपैकीं हजारों दुःखित अबलांचें कल्याण होऊन व्यभिचार, गर्भपात, भ्रूणहत्या व बालहत्यादि पातकें होत आहेत, तीं पुष्कळ अंशीं कमी होतील; असें समजून तुह्मी ह्या मार्गास अनुकूल व्हावें अशी प्रार्थना आहे. शरणागतांस आश्रयदान द्यावें.

**अहो शिंदे, होळकर, गाइकवाडादि राजे महाराज हो!** आपण गोब्राह्मणप्रतिपालक ह्मणवितां. प्रजापालन आपला मुख्य धर्म; असें असून आपल्या राज्यांत शेंकडो दुर्बल गाई वैधव्यपंकांत कुजत पडल्या आहेत, त्यांची कांहींच दाद आपण घेत नाहीं. आर्यशास्त्राप्रमाणें राजास धर्मशासन करण्यास पूर्ण अधिकार आहे. तरी अह्मां अनाथ अबलांच्या हातून निरुपायामुळें अनेक दुराचार होत आहेत, त्यांची बंदी योग्य रीतीनें करणें आपणांस उचित आहे. महाराज! आपल्या आश्रित मंडळीस आज्ञा देऊन आह्मांस दुःखमुक्त करण्याची तजवीज करवावी. राजाज्ञेनें पाहिजे तो प्रबन्ध अमलांत येऊं शकतो. आपण जर शास्त्री पंडित व वैदिक मंडळीस आमच्या पुनर्विवाहाविषयीं शास्त्रार्थ काढण्याबद्दल स्थावर इनामें व वर्षासनें नियत करून द्याल, व पुनर्विवाह करणारांस व करविणारांस उत्तेजन द्याल, तर आमची वैधव्यदुःखापासून सहज सुटका होईल; व आपणांस मोठें यश प्राप्त होईल. आपण जर दृढ निश्चय कराल कीं तरुण विधवांचा पुनर्विवाह प्रचलित झालाच पाहिजे, तर आपणांस कोणी प्रतिकूल होईल असें नाहीं. प्रजेच्या धर्मांत राजानें बिलकुल हात घालूं नये, हा नियम परधर्मी राजास लागू आहे. जेथें राजाचा आणि प्रजेचा एकच धर्म असतो, तेथें राजानें प्रजेच्या धर्माविषयीं प्रबन्ध करणें अनुचित नसून अवश्य आहे. निदान आमच्या ह्या भरतखंडांत अनादिकालापासून हाच परिपाठ चालू आहे. त्यालाच अनुसरून आपण आह्मांवर दया करावी व आह्मांस जेणेंकडून ऐहिक व परमार्थिक सुख प्राप्त होईल अशा योग्य उपायांची योजना

करावी, अशी आपणांस व आपल्या सुशिक्षित व विद्वान् मंत्री व कारभारी मंडळीस हात जोडून प्रार्थना आहे.

**अहो रुढी आजीबाई हो**—आह्मी आपल्या दुःखनिरसनाविषयीं सर्वांस प्रार्थना केली; परंतु तिच्यावर कोणीच लक्ष पुरवीत नाहीं. तुमची आज्ञा नाहीं सबब कोणी आह्मां दिनजनांस साहाय्य करीत नाहीं. मोठमोठे विद्वान शास्त्री, पंडित, भट, भिक्षुक, राजेरजवाडे, राजकारणी पुरुष, सर्व तुमच्या हुकमाचे बंदे असल्यामुळें तुमच्या मर्जी विरुद्ध कोणी कांहींच करूं शकत नाहीं. पूर्वीं ह्या देशांत सर्वत्र **धर्ममहाराजांचा** अम्मल व **विवेकप्रधानाची** कारकिर्दी असे, तेंव्हां वाघ व शेळी एकत्र पाणी पीत असत. कोणासही कांहीं दुःख होत नसे. सर्व प्रजा, श्रीमंत, गरीब, लहान,मोठे, अनाथ, सनाथ, एकसारखे न्यायास पात्र होते; त्यामुळें आमचीही स्थिति बरी असे. आतांसरखा अन्याय व जुलूम बिलकूल होत नसे. परंतु आज कित्येक वर्षांपासून तुह्मी व तुमच्या अनुयायांनीं, **धर्म**महाराजांस व त्यांच्या **विवेक**प्रधानास पदभ्रष्ट व देशभ्रष्ट करून परद्वीपीं हांकून देऊन सामाजिक सर्व राज्य आपल्या हस्तगत केलें आहे. तुमच्या राज्यांत आह्मां गरीबांची जी दुर्दशा झाली आहे ती सांगतां पुरवत नाहीं. तुमची वृद्धावस्था असल्यामुळें तुह्मांस डोळ्यांनीं दिसेनासें झालें आहे व आमचें दुःखोद्गार तुह्मांस ऐकूं येत नाहींत. आतां आह्मी तुमच्या कानाशीं मोठ्यानें ओरडून तुमची विनयपूर्वक प्रार्थना करीत आहोंत तरी तिजकडे लक्ष देऊन आह्मांस दुःखमुक्त करावें. **मायबाई** ! आह्मीं तुमच्या प्रजेपैकींच आहोंत व फारच त्रस्त आहोंत तरी इतरांप्रमाणें आह्मांसही न्याय मिळावा. तुमच्या हुकुमांत कधीं फेरफार होत नाहींत असें नाहीं; तुमचे अम्मलदारलोक तुमची कधीं अवज्ञा करतात असें नाहीं; ते तर तुमची आज्ञा बजावण्यास एका पायावर उभे असतात. असें असतां आमच्या हिताविषयीं तुह्मी कांहीं तजवीज लौकर कांहो करीत नाहीं? आमच्या संबंधानें जे जे कायदे तुमच्या दरबारांतून पसार झाले असतील त्यांचें एकवेळ नीट परिशीलन होऊन त्यांपैकीं जे अहितकारक ठरतील ते रद्द करण्याविषयीं आज्ञा द्यावी. सध्या जे कायदे आह्मांविषयीं चालू आहेत, ते आह्मांस फारच हानिकारक आहेत; त्यांपासून आह्मी ऐहिक व पारलौकिक सुखांस मुकतों, तरी ते बदलून त्यांऐवजीं दुसरे आह्मांस हितकारक असे नियम स्थापन करावे, अशी

तुह्मांस आह्मी अति दीन व करुणास्वरें करून विनंती करितों. **मातुःश्री**, आपल्या अनाथ मुलींवर दया करा!

**परमेश्वरा**! तुझ्या ह्या अफाट सृष्टींत असंख्य प्राणी आहेत, त्यांपैकीं आह्मांसारिखे दुःखित व हतभागी इतर कोणी असतील असें आह्मांस वाटत नाहीं. ह्यांत ह्मणजे तुझा अन्याय व पक्षपात आहे असें नाहीं. तूं तर सर्व प्राण्यांस ज्यांच्या त्यांच्या स्थितीप्रमाणें ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें दिलीं आहेस; त्यांच्या योगानें ते ऐहिक सुखाचा व दुःखाचा उपभोग घेतात. सर्व प्राण्यांत मनुष्यप्राणी श्रेष्ठ असून इतरांपेक्षां त्यास ज्ञानही विशेष आहे. त्या ज्ञानबलानें तो सारासार विचार करूं शकतो, व प्रापंचिक आणि पारमार्थिक बऱ्या वाईट सर्व गोष्टी जाणूं शकतो. ह्या सृष्टींत अनादि कालापासून मोटमोठें ज्ञानवान् व नीतिमान् पुरुष होत आले, व त्यांनीं मनुष्य मात्रास संसारिक व पारलौकीक सुख प्राप्त होण्याविषयीं अनेक प्रबंध वेळोवेळीं केले. त्यां प्रबंधाचें अनुकरण जे जे लोक करीत गेले त्यांना संसारसुख उत्तम प्रकारें प्राप्त होऊन पारलौकिक सुखही प्राप्त होत गेलें. परंतु ह्या आमच्या हतभाग्य देशांत कित्येक वर्षांपासून धर्म व नीति यांचा ऱ्हास होऊन, जिकडे तिकडे अव्यवस्था व अन्याय यांचें आधिक्य झालें आहे. स्त्रीपुरुष सर्वच-विद्याहीन झाल्यामुळें परस्परांच्या हक्कांविषयीं अज्ञ झाले. पुरुषांचें प्राबल्य विशेष असल्यानें स्त्रियांची अगदीं पायमल्ली झाली. पूर्वीं स्त्रियांची योग्यता व त्यांचा मान असे तो आतां अगदींच नाहींसा झाला आहे, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. स्त्रीपुरुषांच्या योगानें संसारसुख सिद्ध होण्याचे जे नियम महात्म्यांनीं करून ठेविले आहेत व ज्यांचें पूर्वीं पूर्णपणें अनुकरण होत असे, ते आतां केवळ पुस्तकांत उपलब्ध आहेत व कांहीं ब्राह्मणांस मुखोद्गत आहेत. वास्तविक प्रचार पाहिला तर तो विलक्षण दिसतो. विवाहप्रकरणांत वर व वधू यांच्या योग्यायोग्यतेविषयीं सारखे नियम असून वरपरीक्षा तर आतां होतच नाहीं. द्रव्यलोभानें व मुहूर्त टळण्याच्या रीतीनें शेंकडों मुली ह्मातारे कोतारे व क्षयरोगी अशांच्या गळीं बांधितात. त्या थोड्याच काळांत सर्व सौभाग्यास मुकतात! पुरुषांची अनेक लग्नें होतात; परंतु स्त्रियांस त्या बिचाऱ्या बालविधवा असूनही, पुनर्विवाह करण्याचा अधिकार नाहीं. देवा! पुरुषांच्या अन्यायामुळें आज हजारों तरुण विधवा दुःखार्णांत

होरपळत आहेत, व जीं घोर पातकें त्यांच्या हातून होत आहेत तीं तूं सर्व पाहतच आहेस. त्यांबद्दल शिक्षा कोणास व्हावी हें तूं न्यायाचे दिवशीं ठरविशीलच. आह्मांस तर पक्का भरंवसा आहे कीं ज्यांच्या जुलुमामुळें आह्मी दुष्कर्म करण्यास प्रवृत्त होतों, तेच तुझ्या दंडास पात्र ठरविले जातील. प्रभो! आमचा आतां लवकर अंत होईल तर बरा! आमच्या जिण्यांत कांहीं शोभा अथवा अर्थ नाहीं. आमची सौभाग्यनौका संसारनदींत आनंदानें तरत असतां, एकाएकीं दुर्भाग्यवादळांत सांपडून, मृत्युखडकावर जाऊन आपटली, आणि आह्मी वैधव्यडोहांत तेव्हांपासून गटांगळ्या खात आहोंत. नानाप्रकारचे जंतू आमच्या शरीरास तोडिताहेत, त्यांत अति भयंकर व तीव्रदंत **मदन**—मत्स्याच्या वेदना तर आह्मांस अगदीं सहन होत नाहींत. आमचे आईबाप भाऊबंद इष्टमित्र, मोठमोठाले शूरवीर, तटस्थ असून आह्मांकडे पहात आहेत, परंतु त्यांपैकीं कोणासच आमची दया येऊन आह्मांस वर ओढून काढण्याविषयीं ते यत्न करीत नाहींत. आह्मी एवढ्या मोठ्यानें ओरडत असतां व त्यांची करुणा भाकीत असतां, ते आमचा शब्द ऐकल्या न ऐकल्या सारिखें करितात. इतकेंच नाहीं तर कोणी एखादा उदार पुरुष धैर्य धरून आह्मांपैकीं कोणांस वर काढून जीवदान देण्यास सिद्ध झाला कीं, सर्व "काव काव" करून त्या बिचाऱ्यास टोंचून टाकितात व त्याचा अनेक तऱ्हेनें छळ करितात; त्यामुळें आमचे थोडेबहुत जे कोणी हितचिंतक आहेत, ते जागच्या जागींच हळहळत व आह्मांकडे पाहून अश्रु गाळीत स्तब्ध उभे आहेत! दीनबंधो! दीननाथ! तुझ्या शिवाय आह्मांस कोणी त्राता नाहीं. ज्या मृत्यूनें आह्मांस दुःखसागरांत लोटून दिलें आहे तोच आह्मांस त्यांतून काढील तर काढील. इतर कोणाचें सामर्थ्य दिसत नाही. तरी हे परमेश्वरा! आह्मांस लौकर मरण येऊंदे व ह्यापुढें आमच्या देशांत स्त्रियाच उत्पन्न होऊंनयेत, किंवा स्त्रियांस निदान वैधव्यदशा, प्राप्त होऊं नये अशी योजना कर! तूं सर्व कांहीं करण्यास समर्थ आहेस. आह्मीं तुला अनन्य भावें शरण आहों. देवाधिदेवा! अनाथ अबलांवर दया कर!